पुण्यनगरी

# व्यवस्थापनाचे 'मास्टरपीस' बना : प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील

## एमबीए अधिविभागाच्या 'सिंहावलोकन' उपक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यापीठीय शिक्षण घेऊन आपण व्यवस्थापनशास्त्राचे 'मास्टर' तर बनालच; पण या शिक्षणापलीकडे इतरांपेक्षा काही अधिक कलाकौशल्ये आत्मसात करून विद्यार्थ्यांनी 'मास्टरपीस' बनावे. त्यादृष्टीने त्यांना तयार करणारा सिंहावलोकन हा उपक्रम आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागातर्फे आयोजित 'सिंहावलोकन २०२३' या एकदिवसीय व्यवस्थापन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या उपक्रमांत अधिविभागासह विविध १६ महाविद्यालयांतील ४५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी नवनवीन कलाकौशल्ये अवगत करणे गरजेचे आहे. जिद्द, चिकाटी, प्रचंड मेहनत करण्याची तयारी असेल तरच जीवनात यशस्वी होता येते. सिंहावलोकन या व्यवस्थापन कार्यक्रमातील बिझनेस प्लॅन, बिझनेस क्विझ, ॲड सम्राट, ॲड मॅड शो, रायझिंग बुल्स आदी स्पर्धांमुळे स्वतःची गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. तिचा त्यांनी लाभ करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

डॉ. प्रकाश राऊत, एम. बी. ए. विभागाचे संचालक डॉ. आण्णासाहेब गुरव, डॉ. दीपा इंगवले, डॉ. रामदास बोलके, डॉ. तेजश्री घोडके, जयश्री लोखंडे व दीपाली पाटील आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : 'सिंहावलोकन' उपक्रमाच्या उद्घाटन समारंभात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. समोर विविध महाविद्यालयांतून आलेले विद्यार्थी व शिक्षक.

30 APR 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी मास्टरपीस बनावे

## प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचे प्रतिपादन : 'सिंहावलोकन २०२३'चे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठीय शिक्षण घेऊन आपण व्यवस्थापनशास्त्राचे 'मास्टर' तर बनालच, पण या शिक्षणापलीकडे इतरांपेक्षा अधिक कलाकौशल्ये आत्मसात करून विद्यार्थ्यांनी 'मास्टरपीस' बनावे. त्या दृष्टीने त्यांना तयार करणारा सिंहावलोकन हा उपक्रम आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम. बी. ए. अधिविभागाच्यावतीने आयोजित 'सिंहावलोकन २०२३' या व्यवस्थापन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या उपक्रमात अधिविभागासह विविध १६ महाविद्यालयातील ४५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, स्पर्धेच्या युगात जिद्द, चिकाटी, मेहनत, कष्ट करण्याची तयारी असेल तरच जीवनात यशस्वी होता येते. सिंहावलोकनमधील बिझनेस प्लॅन, बिझनेस क्विझ, अॅड सम्राट अॅड मॅड शो, रायझिंग बुल्स आदी स्पर्धांमुळे स्वतःची गुणवत्ता सिद्ध करता येते.

डॉ. प्रकाश राऊत म्हणाले, संशोधनाच्या बळावरच देशाचा आर्थिक, सामाजिक विकास अवलंबून असल्याने विद्यार्थ्यांनी संशोधन कौशल्ये विकसित करणे व जोपासणे गरजेचे आहे.

एम. बी. ए. विभागाचे संचालक डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीपा इंगवले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रामदास बोलके, डॉ. तेजश्री घोडके, जयश्री लोखंडे, दिपाली पाटील आदी उपस्थित होते. भारत डेअरीचे (स्फूर्ती) संचालक धवल मेहता, हर्षद भोसले (फॅशन टॅग), शुभम उडाळे (फोटोग्राफी), सीए ए. एस. पाटील, पेटीएम वेल्थ सेंटर, धनश्री पब्लिकेशन, अॅडऑन मल्टिसर्व्हीसेस, गेट अॅक्टीव्ह डिझाइनिंग आदींचे सहकार्य लाभले. सिंहावलोकन उपक्रमाचे सर्वसाधारण विजेतेपद निपाणी येथील केएलई संस्थेच्या जी. आय. बागेवाडी कॉलेजच्या बीबीएच्या चमूने पटकावले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सिंहावलोकन उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. सोबत प्राध्यापक, विद्यार्थी.

**विविध स्पर्धेतील विजेते**

**बिझनेस क्विझ – द आयक्यू वॉर :** रनरअप – श्रध्दा शिंदे, कावेरी सावंत व विनरअप – रिशी झा, सोहम करंबळेकर, निपाणीतील केएलई सोसायटी बीबीए कॉलेज. **चातुर्य बिझनेस प्लॅन :** रनरअप – रिषी झा आणि सौरभ बेडकर व विनरअप– सुरज कांबळे, सोहम करंबळेकर केएलई सोसायटी बीबीए कॉलेज निपाणी. **रायझिंग बुल्स स्टॉक ट्रेडिंग :** विजेते रनरअप– विश्वजीत आबदार तसेच विनरअप– आदित्य पाटील डीवायपी कॉलेज इंजिनिअरींग, कसबा बावडा. **पोस्टर प्रेझेंटेशन :** रनरअप– मुस्कान नायकवडी, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज आणि विनरअप– भावना जनमाने आणि सृष्टी वागडे. **कार्पोरेट चाणक्य रोल प्ले :** रनरअप जयेश पाटील, मित पगारिया विनरअप– संयुक्ता कलांत्री, प्रिती वैष्णव, सुझान डिसुझा, डीकेटीई, इचलकरंजी. **अॅड सम्राट अॅड मॅड शो :** रनरअप– श्रेअस नवले, अथर्व पाटील, प्रथमेश ठोंबरे, आदित्य धुमाळ आर आय टी कॉलेज इस्लामपूर व विनरअप– स्नेहल चौगुले सायली सरदेसाई, पूजा घाटगे, प्रतिक्षा गायकवाड, ऋतुजा कुंभार, डीकेटीई इचलकरंजी. **ट्रेझर हंट :** एजीपीएम अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विनरअप ठरले.

30 APR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जी. आय. बागेवाडी महाविद्यालयाला सर्वसाधारण विजेतेपद

## शिवाजी विद्यापीठात सिंहावलोकन उपक्रम; १६ महाविद्यालयांतील ४५० विद्यार्थी सहभागी

**कोल्हापूर, ता. २९** : विद्यापीठीय शिक्षण घेऊन व्यवस्थापनशास्त्राचे 'मास्टर' बनण्यासह अधिक कलाकौशल्ये आत्मसात करून विद्यार्थ्यांनी 'मास्टरपीस' बनावे, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागातर्फे आयोजित 'सिंहावलोकन २०२३' एकदिवसीय व्यवस्थापन कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. उपक्रमांत अधिविभागासह विविध १६ महाविद्यालयांतील ४५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. दरम्यान, सिंहावलोकन उपक्रमाचे सर्वसाधारण विजेतेपद निपाणीतील केएलई संस्थेच्या जी. आय. बागेवाडी कॉलेजच्या बीबीएच्या चमूने पटकावले. त्यांनी ११ हजार १११ रुपयांचे पारितोषिक पटकावले.

डॉ. पाटील म्हणाले, 'जिद्द, चिकाटी, प्रचंड मेहनत, कष्ट करण्याची तयारी असेल तरच जीवनात यशस्वी होता येते. सिंहावलोकन व्यवस्थापन कार्यक्रमातील बिझनेस प्लॅन, बिझनेस क्विझ, अ‍ॅड सम्राट, अ‍ॅड मॅड शो, रायझिंग बुल्स स्पर्धांमुळे गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी आहे.'

डॉ. अण्णासाहेब गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीपा इंगवले यांनी आभार मानले. याप्रसंगी यावेळी शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाऊंडेशनचे डॉ. प्रकाश राऊत, डॉ. रामदास बोलके, डॉ. तेजश्री घोडके, जयश्री लोखंडे व दीपाली पाटील उपस्थित होते. आयोजनासाठी भारत डेअरीचे (स्फूर्ती) संचालक धवल मेहता, हर्षद भोसले (फॅशन टॅग, राजारामपुरी), शुभम उडाळे (फोटोग्राफी), सीए ए. एस. पाटील, पेटीएम वेल्थ सेंटर, धनश्री पब्लीकेशन, अ‍ॅड ऑन मल्टिसर्व्हिसेस, गेट अ‍ॅक्टिव्ह डिझायनिंगचे सहकार्य मिळाले.



**कोल्हापूर : सिंहावलोकन उपक्रमात निपाणीतील केएलई जी. आय. बागेवाडी महाविद्यालयाचा चमू सर्वसाधारण विजेतेपदाचा मानकरी ठरला.**

### विविध स्पर्धा व विजेते अनुक्रमे असे

- बिझनेस क्वीझ- द आयक्यू वॉर - रिशी झा व सोहम करंबळेकर (केएलई सोसायटी बीबीए कॉलेज, निपाणी), श्रद्धा शिंदे व कावेरी सावंत.
- चातुर्य बिझनेस प्लॅन : सूरज कांबळे, सोहम करंबळेकर (केएलई सोसायटी बीबीए कॉलेज, निपाणी), रिशी झा आणि सौरभ बेडकर.
- रायझिंग बुल्स स्टॉक ट्रेडिंग : आदित्य पाटील (डीवायपी इंजिनिअरिंग कॉलेज, कसबा बावडा), विश्वजीत आबदार.
- पोस्टर प्रेझेंटेशन : भावना जनमाने आणि सृष्टी वागडे, मुस्कान नायकवडी (डॉ. घाळी महाविद्यालय, गडहिंग्लज).
- कॉर्पोरेट चाणक्य रोल प्ले : संयुक्ता कलांत्री, प्रीती वैष्णव, सुझान डिसूझा (डीकेटीई, इचलकरंजी), जयेश पाटील, मित पगारिया.
- अ‍ॅड सम्राट अ‍ॅड मॅड शो : स्नेहल चौगुले, सायली सरदेसाई, पूजा घाटगे, प्रतीक्षा गायकवाड, ऋतुजा कुंभार (डीकेटीई इचलकरंजी), श्रेयस नवले, अथर्व पाटील, प्रथमेश ठोंबरे, आदित्य धुमाळ (आरआयटी महाविद्यालय, इस्लामपूर).
- ट्रेझर हंट : एजीपीएम अधिविभाग (शिवाजी विद्यापीठ).

लोकमत

# आभासी वास्तविकता प्रणालीचे उद्‌घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात उद्या, सोमवार, दि. १ मे रोजी शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे उद्‌घाटन पालकमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते होणार आहे. शिवाजी विद्यापीठाचा नावीन्यपूर्ण योजना, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अनुदानित प्रकल्पांतर्गत होणाऱ्या या कार्यक्रमात शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे उद्‌घाटन शालेय शिक्षण आणि मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर करणार आहेत. व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात सकाळी ११ वाजता होणाऱ्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असून जिल्हाधिकारी राहुल रेखावार, प्रकुलगुरू डॉ. पी. एम. पाटील यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

पुढारी

# विद्यापीठात उद्या शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली उद्घाटन समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ, नावीन्यपूर्ण योजना, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर अनुदानित प्रकल्पांतर्गत शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचा उद्घाटन समारंभ सोमवार (दि.१) रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठातील व्यवस्थापन परिषद सभागृहात शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते व आ. सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. याप्रसंगी जिल्हाधिकारी राहुल रेखावार, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

तरुण भारत

# आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणालीचे सोमवारी उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजना अनुदानित प्रकल्पांतर्गत 'शालेय शिक्षणात आभासी वास्तविकता तंत्रज्ञान प्रणाली'चे उद्घाटन उद्या १ मे रोजी सकाळी ९.३० वाजता शालेय शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री दिपक केसरकर यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील व्यवस्थापन परिषद सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सतेज पाटील उपस्थित राहणार आहेत. जिल्हाधिकारी राहुल रेखावार, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची मुख्य उपस्थिती राहणार आहे. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषवणार आहेत, अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रसिध्दीपत्राव्दारे प्रसिद्ध केली आहे.

सकाळ

# परीक्षा अर्ज भरण्यास विद्यापीठाकडून मुदतवाढ

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या हितास्तव मुदतवाढ करण्यात आली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागात विनाविलंब ४ मे, तर विलंब शुल्कासह १० मेपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

तरुण भारत



# विद्यापीठ परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ हिवाळी सत्रातील परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागात विनाविलंब शुल्कासह ४ मे तर विलंब शुल्कासह १० मे पर्यंत परीक्षा अर्ज भरावा. महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागांनी ऑनलाईन परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्कासह ६ मे तर विलंबशुल्कासह १२ मेपर्यंत ॲप्रुव्ह करावयाचा आहे. महाविद्यालय अथवा अधिविभागांनी विद्यापीठातील परीक्षा विभागात विद्यार्थ्यांनी भरलेल्या परीक्षा अर्जांच्या याद्या विनाविलंब शुल्कासह १० तर विलंबशुल्कासह १६ मेपर्यंत सादर करावयाच्या आहेत, असे आवाहन परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.